<u>प्रेसनोट –दि.०९/०३/२०१९</u>

<u>समर्थ पोलीस ठाणे पुणे</u>

**समर्थ पोलीस ठाणे, पुणे येथे जागतिक महिला दिन हा स्वराज्य रक्षक संभाजी या मालिकेतील येसूबाई तथा अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांचे उपस्थितीत साजरा.**

दिनांक ०८/०३/२०१९ रोजी सायंकाळी ५-३० ते ७-०० वा. चे दरम्यान जागतिक महिला दिना निमित्त श्री. बाळकृष्ण कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक , समर्थ पोलीस ठाणे पुणे यांनी कार्यक्रम आयोजित केलेला होता. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती ही ॲड. स्मिता निकम, नगरसेविका सुजाता शेटटी आणि स्वराज्य रक्षक संभाजी या झी मराठी टीव्ही सिरीयल मधील येसूबाई म्हणून काम करणारी प्रसिध्द अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड व माहेर संस्थेच्या श्रीमती म्हात्रे यांची होती. तसेच या कार्यक्रमास ताराचंद हॉस्पीटल पुणे येथील डॉक्टर्स , तसेच पोलीस स्टेशन कडील महिला दक्षता समिती सदस्या , महिला पोलीस उप निरीक्षक श्वेता शिंदे तसेच समर्थ पोलीस ठाण्यातील महिला कर्मचरी तसेच सहायक पोलीस निरीक्षक श्री. शिकलगार आणि सोमवार पेठ पोलीस वसाहत व भवानी पेठ पोलीस वसाहत येथील रहिवाशी महिला आणि पोस्टे हद्दीतील विविध स्तरातील महिला अशा एकूण २०० ते २५० महिला उपस्थित होत्या. उपस्थित महिलांना ॲड. स्मिता निकम यांनी महिला विषयक अत्याचार व त्या अनुषंगाने असलेले कायदे व या प्रकारच्या गुन्हयांना प्रतिबंध व अशा प्रसंगांना तोंड देणारे महिलांना या बाबत विविध उपाय व पर्याय यांची सविस्तर माहिती दिली.नगरसेविका सुजाता शेटटी यांनी देखील महिला दिन हा केवळ एक दिवसाचा न राहता ३६५ दिवस असला पाहिजे यासाठी आपण सर्वांनी अंर्तमुख होऊन प्रयत्न केले पाहिजेत. व याकरीता उपस्थित महिलांना मार्गदर्शन करुन महानगरपालिकेच्या महिलांसाठी खास असलेल्या सुविधांची माहिती दिली. अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड तथा येसुबाई यांनी देखील उपस्थित महिलांना शिक्षण व आर्थिक निर्भरता ही सध्याचे काळात महत्वाची असल्याचे सांगून यासाठी सातत्याने प्रयत्नशिल रहाणे गरजेचे असल्याचे सांगितले. माहेर यासारख्या सातत्त्याने महिलांसाठी कार्य करणा-या संस्था यांच्या मुळे आजही आयुष्यात दुःखद प्रसंगास सामोरे जाणा-या महिलांना निश्चीत पणे खंबीर आधार उपलब्ध आहे असल्याचे सांगितले. तसेच येसूबाई साकारताना आलेले व येत असलेले अनुभव त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांगता श्रीमती श्वेता शिंदे , महिला पोलीस निरीक्षक , विशेष शाखा पुणे यांनी केले.

---------------


पोलीस आयुक्तालय , पुणे शहर
समर्थ पोलीस ठाणे
आयोजित
जागतीक महिला दिन - ८ मार्च २०१९
महिला मेळावा व कायदे विषयक मार्गदर्शन
-: प्रमुख उपस्थिती :-
मा.श्री.सुहास बावचे (म.पो.से)
मा.श्री.बाळकृष्ण कदम